आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता
१३ जानेवारी २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- उत्तर प्रदेशात प्रयागराजमध्ये महाकुंभ मेळ्याला सुरुवात, पहिल्याच दिवशी दीड कोटी भाविकांचं अमृत स्नान

- देशातल्या पावणे २ लाख नागरिकांना हज यात्रेला जाण्याची संधी मिळणार

- पाकिस्तानकडून घुसखोरीचे प्रयत्न सुरूच, गेल्यावर्षी मारले गेलेल्यांपैकी ६० टक्के दहशतवादी पाकिस्तानी असल्याची लष्करप्रमुखांची स्पष्टोक्ती

**आणि**

- पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेचं आजपासून नवी दिल्लीत आयोजन, प्रतीक वाईकर आणि प्रियांका इंगळेकडे भारतीय संघाचं नेतृत्व

**<><><><><><>**

महाकुंभ मेळ्याला आजपासून उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं पौष पौर्णिमेच्या पहिल्या अमृत स्नानानं सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी सुमारे दीड कोटी भाविकांनी इथं स्नान केलं. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**होल्ड**

*गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या त्रिवेणी संगमावर महाकुंभ मेळ्याच्या पहिल्या दिवशी स्नानासाठी आलेल्या भाविकांचं हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करुन स्वागत करण्यात आलं. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी महाकुंभ नगरमधील मंदिरं आणि प्रमुख स्थळांवर सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यात आली आहे. या ठिकाणी सात थरांची तैनात करण्यात आले आहेत. निगराणी ठेवण्यासाठी २ हजार आठशे सीसीटीव्ही*

*सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. सुरक्षेसाठी ५० हजारांहून अधिक पोलीस तेनात करण्यात आलेले आहेत.कॅमेरे आणि कृत्रिम बुद्धीमतेवर आधारित कॅमेरे लावले आहेत. नद्या आणि घाटांची स्वच्छता करण्यासाठी  दोन हजार गंगा सेवादूतही तैनात करण्यात आले आहेत. २६ फेब्रुवारी रोजी येणाऱ्या महाशिवरात्री पर्यंत विविध मुहुर्तांना इथं अमृतस्नान होणार आहे.*

**<><><><><>**

यंदाच्या हाज यात्रेकरता भारतातून पावणे दोनलाख जणांना जाता येईल. केंद्रीय अल्पसंख्याक कल्याण मंत्री किरेन रिजिजू यांनी  समाजमाध्यमावर ही माहिती दिली. हाज यात्रेसाठी भारतीयांचा कोटा एक लाख ७५ हजार २५ असा निश्चित करणाऱ्या  करारावर रिजिजू आणि सौदी अरेबियाचे हाज आणि उमरा विभागाचे मंत्री एच ई तौफीक़ बिन फौझान अल- राबिया यांच्या उपस्थितीत आज स्वाक्षऱ्या झाल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या कराराचं स्वागत केलं आहे. हाज यात्रा सुखकर व्हावी याकरता शक्य त्या सर्व सेवा सुविधा द्यायला सरकार वचनबद्ध असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरच्या उन्नतीसाठी सरकार वचनबद्ध आहे. या प्रदेशाच्या प्रगतीला बाधक ठरणाऱ्या समस्यांचं निराकारण करण्यासाठी सरकार सज्ज आहे, याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आहे. जम्मू काश्मीर मधल्या सोनमर्ग बोगद्याचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. या बोगद्यामुळं जम्मू काश्मीरसोबत बारमाही संपर्क कायम राहून पर्यटनाबरोबरच रोजगार निर्मिती, आरोग्य सुविधा यानांही चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ जम्मू काश्मीरच्या नागरिकांना मिळत असल्याबद्दल मोदी यांनी समाधान व्यक्त केलं.

<><><><><><>

केंद्र सरकारनं आतापर्यंत १३ लाख ६८ हजार क्विंटल सोयाबीनची किमान आधारभूत दरानं खरेदी केली आहे, अशी माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज नवी दिल्लीत दिली. महाराष्ट्रात ३१ जानेवारी आणि राजस्थानमध्ये ४ फेब्रुवारीपर्यंत ही खरेदी सुरू राहणार आहे. शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात किटकनाशक मिळतील, याची खबरदारी घेण्याचं आवाहन त्यांनी राज्यांना केलं.

<><><><><><>

सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरुपी यंत्रणा उभारण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केली आहे. पणन विभागाच्या १०० दिवसांच्या कामाचा आढावा घेताना ते बोलत होते.

राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी शक्तीपीठ महामार्गाच्या कामाचं नियोजन सर्वांना विश्वासात घेऊन तत्परतेनं सुरु करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. समृद्धी महामार्गाचं उर्वरित अंतिम टप्प्याचं आमणेपर्यंतचे ७६ किलोमीटर लांबीचे काम तत्परतेनं पूर्ण करुन फेब्रुवारीपर्यंत हा महामार्ग पूर्णपणे खुला करावा, तसंच मंत्रालय परिसरात नविन सात मजली इमारत उभारण्याच्या कामाची सुरुवात येत्या शंभर दिवसात करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

<><><><><><>

दिल्ली सरकारच्या कथित अबकारी घोटाळ्याबाबत कॅगचा अहवाल विधानसभा अध्यक्षांकडे सादर करायला विलंब का झाला, यावरुन दिल्ली उच्च

न्यायालयानं आज दिल्लीतल्या आप सरकारला धारेवर धरलं. याबाबत भाजपानं दाखल केलेल्या याचिकेची सुनावणी आज न्यायालयानं केली. त्याबरोबरच, दिल्ली विधानसभेचं विशेष अधिवेशन बोलवण्यासाठी भाजपा आमदारांनी दाखल केलेल्या याचिकेवरही न्यायालयात सुनावणी झाली. निवडणुका जवळ आल्या असल्यानं विशेष अधिवेशन बोलावणं शक्य दिसत नसल्याचं न्यायालयानं सांगितलं.

**<><><><><><>**

गेल्यावर्षी मारले गेलेल्या दहशतवाद्यांपैकी साठ टक्के पाकिस्तानी होते, अशी माहिती लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी दिली आहे. जम्मू-काश्मिरमधली परिस्थिती नियंत्रणात असली तरी घुसखोरीचे प्रयत्न होतच आहेत. पाकिस्तानचा यामागे हात असल्याचे ते आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत म्हणाले. देशाच्या उत्तरेकडच्या सीमेवरची परिस्थिती संवेदनशील असली तरी स्थिर आहे. जम्मू काश्मीरमध्ये हिंसक कारवायांचं प्रमाण घटलं असून इथले नागरिक शांततेच्या बाजूने आहेत, असंही ते म्हणाले.

मणिपूरमधली परिस्थिती सध्या नियंत्रणात आहे. हिंसाचाराच्या घटना सुरू आहेत, मात्र यावर पूर्ण नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न सरकार करत आहे, असं त्यांनी सांगितलं. भारत - म्यानमार सीमेवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी गस्त वाढवण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

भारताला २०२७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्यात देशातल्या युवकांचा वाटा मोठा असेल, असं सैन्य दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांनी म्हटलं आहे. जनरल चौहान यांनी आज नवी दिल्लीत राष्ट्रीय छात्र सेनेच्या प्रजासत्ताक दिन शिबिरात छात्रांना मार्गदर्शन केलं, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><><>**

गेल्या आठवड्यापासून देशातल्या शेअर बाजारात सुरू असलेली घसरण आजही कायम होती. जागतिक आणि स्थानिक कारणांमुळं देशातले दोन्ही शेअर बाजार घसरले. दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार ४९ अंकांनी कोसळून ७६ हजार ३३० अंकांवर बंद झाला. निफ्टी ३४६ अंकांनी घसरला आणि २३ हजार ८६ अंकांवर स्थिरावला. व्यवहाराच्या दरम्यान निफ्टी २३ हजारांची पातळीही मोडणार अशी शक्यता निर्माण झाली होती.

अमेरिकेत बेरोजगारीचे प्रमाण कमी झाल्यानं व्याजदर कपातीची शक्यता कमी झाली. कच्चा तेलाचे वाढलेले दर, डॉलरच्या तुलनेत घसरत असलेला रुपया, परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून होणारी विक्री यामुळे शेअर बाजारांना फटका बसला. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका, धातू, वाहन, औषध निर्मिती, बांधकाम यासारख्या जवळपास सगळ्याच क्षेत्रातले समभाग आज घसरले.

**<><><><><><>**

ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर गेल्या महिन्यात ५ पूर्णांक २२ शतांशांवर पोहोचला. गेल्या ४ महिन्यातला हा नीचांक असल्याचं केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने म्हटलं आहे. नोव्हेंबरमधे हा दर ५ पूर्णाक ४८ शतांश टक्क्यांवर होता. अन्नपदार्थांच्या किमतीत घसरण झाल्यामुळे महागाई कमी झाल्याचं पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या बुधवारी राज्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते मुंबईतल्या नौदलाच्या गोदीत आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी या युद्धनौका आणि आयएनएस वाघशीर ही पाणबुडी राष्ट्राला

अर्पण करण्यात येणार आहेत. पहिल्यांदाच एकापेक्षा अधिक युद्धनौका किंवा पाणबुडी एकाचवेळी नौदलात सामील होणार आहे.

याशिवाय, प्रधानमंत्री नवी मुंबईत खारघर इथं इस्कॉनच्या श्री श्री राधा मदनमोहन मंदिराचं उद्घाटनही करतील.

**<><><><><>**

अमेरिकेत कॅलिफोर्नियाच्या जंगलात लागलेल्या वणव्यात ठार झालेल्यांची संख्या २४ झाली आहे. या वणव्यामुळे अब्जावधी डॉलर्सचं नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

**<><><><><>**

नायजेरियात झाम्फारा या राज्यात लष्कराच्या हवाई हल्ल्यात १६ नागरिक ठार झाले असून अनेक जण जखमी झाले आहेत. हे नागरिक गुन्हेगारी टोळीचा भाग असल्याचा गैरसमज झाल्यानं लष्करानं हा हल्ला केला.

**<><><><><>**

काँगो मधल्या उत्तर किवू  आणि दक्षिण किवू प्रांतातली बंडखोर सशस्त्र गटांच्या ताब्यातली शहरं लष्करानं परत मिळवली आहेत. ही शहरं अनेक महिन्यांपासून बंडखोरांच्या ताब्यात होती.

**<><><><><>**

पहिल्या खो-खो विश्वचषक २०२५ला आजपासून नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी मैदानावर सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत २० पुरुष संघ तर १९ महिला संघ सहभागी होत आहेत. आज या स्पर्धेत भारतीय पुरुष संघाचा पहिला सामना नेपाळविरुद्ध होणार आहे. हा सामना रात्री साडे आठ वाजता हा सामना सुरू होणार असून दूरदर्शन स्पोर्ट्स वाहिनीवर त्याचं थेट प्रक्षेपण पाहता येईल. पुरुष संघाचं

नेतृत्व प्रतीक वायकर करत असून प्रियांका इंगळे ही महिला संघाची कर्णधार आहे. या विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना १९ जानेवारी रोजी होणार आहे.

**<><><><><><>**

मकरसंक्रांतीचं पर्व देशभरात उत्साहाने सुरु झालं. आज संक्रांतीचा आदला दिवस. देशाच्या विविध भागात विविध नावांनी हा सुगीचा उत्सव साजरा केला जातो. पंजाब, हरयाणा आणि उत्तर भारतात लोहडी, ईशान्य आणि पूर्वेकडच्या राज्यांमधे माघ बिहू, महाराष्ट्र आणि तेलंगणात भोगी म्हणून साजरा केला जातो. राज्यात संक्रांतीनिमित्त खरेदीचा उत्साह दिसत आहे. तीळ गूळ हलव्याचे दागिने, तसंच विविध आकारांचे रंगीबेरंगी पतंग अशा वस्तूंनी बाजार फुलले आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज साजऱ्या होत असलेल्या लोहडी तसंच उद्या देशाच्या विविध भागात साजऱ्या होणाऱ्या मकर संक्रांत, पोंगल, माघ बिहू या सणानिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**//<><><><><><>//**